| MHNS230002862024 | दाखल तारीखः १५/०२/२०२४<br>नोंदणी तारीखः १७/०२/२०२४<br>निकाल तारीखः १७/०३/२०२६<br>कालावधीः ०२वर्षे ०१महिने ००दिवस |
|---|---|

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी, जि. नाशिक येथील न्यायालयात**

**(पिठासन अधिकारीः श्रीमती ए. सी. रोकडे )**

**फौ.कि.अर्ज क्र. ४१/२०२४** **निशाणी क्र.१५**

**१. सौ. सुनिता नामदेव आरे,**

**वय–** ३१ वर्षे **धंदा–** घरकाम,

**२. कु. गणेश नामदेव आरे,**

**वय –** ११ वर्षे, **धंदा –** शिक्षण,

**३. कु. कार्तिक नामदेव आरे,**

**वय –** ०९ वर्षे, **धंदा –** शिक्षण,

**सर्व रा.** जांबवाडी, ता. इगतपुरी, जि. नाशिक ...**अर्जदार**

**विरुध्द**

**श्री. नामदेव कमळु आरे**

**वय–**३३ वर्षे , **धंदा–** नोकरी,

**रा.** खळंबेपाडा, तानशेत, ता. शहापुर, जि. ठाणे **...गैरअर्जदार**

---

**अर्जदारां तर्फे विधिज्ञः** श्री. एन. आर. चांदवडकर

**गैरअर्जदारा तर्फे विधिज्ञः** श्री. **ए. आर. शिंदे**

---

**न्यायनिर्णय**

**(दिनांक १७ मार्च २०२६ रोजी पारीत )**

प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५(१) अन्वये पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणेः**

**२.** अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न समाजाच्या रिती रिवाजप्रमाणे दि.२३. ०५.२०१० रोजी मौजे जांबवाडी, ता इगतपुरी येथे झाले असुन सदर लग्न संबंधातून त्यांना अर्जदार क्र. २ व ३ ही दोन मुले आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांकडे खळंबेपाडा, ता. शहापुर, जि. ठाणे येथे नांदण्यास गेली. लग्नाच्या काही दिवसांनतरच गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ यास मारहाण व शिवीगाळ करु लागला. गैरअजदारास दारुचे व्यसन आहे. गैरअर्जदाराला दारुचे व्यसन असल्यामुळे तो त्याचा पुर्ण पगार दारु पिण्यामध्ये घालवित असे. तो अर्जदार क्र. १ हिस नेहमी माहेरुन पैसे आणण्यासाठी दबाव टाकत असे. अर्जदार ही पैसे देण्यास तयार नसल्याने गैरअर्जदार तिला मारहाण व शिवीगाळ करत होता. गैरअर्जदार व त्याच्या भाऊ व भावजई हे अर्जदार क्र. १ हीस उपाशीपोटी ठेवुन, 'तुझा नवरा दारुडा आहे, तु तुझ्या घर खर्चासाठी माहेरुन पैसे आण' असे म्हणत असे. अर्जदार हिने गैरअर्जदाराला वारंवार समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु, त्याने ऐकले नाही.

**३.** अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार व त्याच्या भावाने अर्जदार क्र. १ हिस जुलै २०२१ मध्ये शिवीगाळ व मारहाण करुन उपाशी पोटी, दोन्ही मुलांसह घराबाहेर हाकलुन दिले. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या आईकडे जांबवाडी, ता. इगतपुरी येथे राहत आहे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारासोबत प्रमाणीकपणे नांदणेस तयार असुन तिने दि.०६.१०.२०२३ रोजी वकीलामार्फत त्याला नोटीस देखील पाठविलेली आहे. सदरची नोटीस मिळुन देखील गैरअर्जदार अर्जदारास घेण्याकरीता आलेला नाही. तेव्हापासुन गैरअर्जदार याने अर्जदार व तिच्या मुलांची कोणतीही चौकशी केलेली नाही. तसेच अन्नवस्त्राची व्यवस्था केलेली नाही. गैरअर्जदार हा बांधकाम ठेकेदारी व मजुरीचे काम करुन त्यापासुन त्याला ३० ते ३५ हजार रु दरमहा उत्पन्न मिळते. गैरअर्जदारावर अर्जदाराशिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. गैरअर्जदार हा अर्जदारास एकत्रीतपणे दरमहा रु. १६,०००/– पोटगी देण्यास समर्थ आहे. सबब सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार हा नोटीस बजावणी होवुन देखील हजर न राहिल्यामुळे

सदर प्रकरण त्याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

५. अर्जदारांचे कथन व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर न्यायनिर्णितीसाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिध्द करते का की गैरअर्जदाराकडे पर्याप्त उत्पन्नाचे साधन असुन त्याने तिच्या उदरनिर्वाहकडे दुर्लक्ष करुन उपेक्षा केली? | **... होकारार्थी** |
| २. | अर्जदार असे सिध्द करते का की ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे? | **... होकारार्थी** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **... होकारार्थी** |
| ४. | कोणता आदेश ? | **..अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ व २ करीताः–**

६. सदर प्रकरणात अर्जदार क्र. १ हिने तिचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.७ वर दाखल केले आहे. याउलट गैरअर्जदार यांनी वारंवार संधी देवूनही कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

७. अर्जदार क्र. १ हि गैरअर्जदार याची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हि त्यांची मुले असल्याने त्यांना निश्चितच फौजदार प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये गैरअर्जदाराकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे.

८. अर्जदार हिने तिच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नि.क्र. १ वरील मजकुराप्रमाणेच कथन केलेले आहे. सदर मजकुरातील पुनरावृती टाळण्यासाठी तो मजकुर येथे नमुद करण्यात आला नाही. अर्जदाराने तिचा पुराव्यात गैरअर्जदार यांनी दिलेल्या शारीरीक व मानसिक त्रासाबाबत कथन केलेले आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदारास शारीरीक व मानसिक त्रास दिला या अर्जदाराच्या

म्हणण्यास पुष्टी प्राप्त होते. गैरअर्जदार याच्याकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असुनही त्याने अर्जदार यांच्याकडे हेतुपुस्पर दुर्लक्ष केलेले असुन त्यांचा त्याग केलेला आहे. याउलट अर्जदार यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार यांना पुरेशी संधी देऊन देखील अर्जदाराच्या पुराव्यास आव्हानित केलेले नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिच्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर तिच्या तोंडी पुराव्याने सिध्द होत आहे. यावरुन गैरअर्जदार याने उत्पन्नाचे पुरेसे साधन असतांनाही अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाकडे हेतुपुर्वक दुर्लक्ष केले हे सिध्द होत आहे. सबब मी मुद्‌दा क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीताः–</u>**

**९.** अर्जदार यांनी गैरअर्जदारांकडून उदरनिर्वाहासाठी अर्जदार क्र. १ हिस दरमहा रु. १०,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यास प्रत्येकी दरमहा रु. ३,०००/–मिळावे अशी मागणी केलेली आहे. अर्जदाराने तिच्या पुराव्यात गैरअर्जदार हा बांधकाम ठेकेदार व मजुरी काम करुन त्यापासुन त्यास दरमहा रु. ३० ते ३५ हजार उत्पन्न मिळते. परंतु अर्जदाराने तिच्या कथनास पृष्टी देणारा कोणताही दस्त्ऐवज सादर केला नाही. त्यामूळे अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांना उत्पन्न मिळते हे सिध्द झालेले नाही. परंतू गैरअर्जदार यांनी सुध्दा त्यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा सादर केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ हा श्रम करण्यास सक्षम असा व्यक्ती आहे. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ सोबत गैरअर्जदारापासुन विभक्त राहते हे अभिलेखावर आलेले आहे. अशा परीस्थतीत अर्जदारांचा राहणीमानाचा दर्जा, जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती, गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न तसेच अर्जदार क्र. २ व ३ च्या पालनपोषणाचा खर्च याचा विचार करता अर्जदार क्र. १ हिस दरमहा रु. ३०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यास दरमहा रु. १०००/– उदरनिर्वाहासाठी पोटगी मंजूर केल्यास अर्जदार हे त्यांचा उदरनिर्वाह करु शकतील व गैरअर्जदार क्र. १ हा सदरील रक्कम देवू शकेल. सबब मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.४ करिताः–</u>**

**१०.** अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ त्याचे मुले

आहेत. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास कोणतेही कारण नसतांना नाकारलेले असुन त्याच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदारास सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज हा रक्कम रु. २,०००/– खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षणार्थ खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र.०१ हिस दरमहा रक्कम रु. ३०००/– (तीन हजार रुपये) व अर्जदार क्र.०२ व ०३ यास दरमहा रक्कम रु.१०००/– (एक हजार रुपये) प्रत्येकी प्रमाणे पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन अदा करावी.

३. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास अर्जाचा खर्च रक्कम रु. २,०००/– (दोन हजार रुपये) द्यावा.

४. न्यायनिर्णयाची प्रत आदेशाच्या अंमलबजावणी करिता संबंधीत पोलीस स्टेशनला देण्यात यावी.

५. सदर आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य नियमाप्रमाणे देण्यात यावी.

APARNA CHANDRAKANT ROKADE

Digitally signed by APARNA CHANDRAKANT ROKADE
Date: 2026.03.17 11:19:37 +0530

**दिनांकः–**१७.०३.२०२६

( श्रीमती. ए. सी. रोकडे )

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी,**

**ता.इगतपुरी, जि. नाशिक.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. G. Sonawane |
| Court | : | J. M. F. C. & C.J.J.D.at Igatpuri. |
| Date | : | 17-03-2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 17-03-2026 |
| Order uploaded on | : | 23-03-2026 |